महाराष्ट्र शासन

क्रमांक :- एससीवाय-२०१९/प्र.क्र.१३४/म-७
महसुल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २२ जून, २०२०

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त

विषय :- महसुल मंडळ दैनंदिन पर्जन्यमानाची आकडेवारी संकलित करणेसंदर्भात

संदर्भ :- १) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे पत्र क्र. २०२०/महसुल/नैआ/२/कावि, दि. २९.०५.२०२०

२) शासनाचे समक्रमांकाचे दि. १२.०६.२०१९ चे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ येथील पत्रान्वये जिल्ह्यातील सर्व महसुल मंडळ स्तरावरून मंडळ अधिकारी/ तलाठी यांचेमार्फत पर्जन्यविषयक आकडेवारी हस्तगत करून वापरात घ्यावी किंवा कसे या बाबत मार्गदर्शन मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी विनंती केली आहे.

यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, महसुल विभागामार्फत महसुल मंडळ स्तरावर बसविण्यात आलेल्या म्यान्युअल पर्जन्यमापक यंत्रांच्या आधारे "महारेन" प्रणालीमार्फत संकलित करण्यात येणारी आकडेवारी व स्कायमेट वेदर सर्व्हिसेस यांच्यामार्फत महसूल मंडळामध्ये बसविण्यात आलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रामार्फत "महावेध" प्रणालीअंतर्गत उपलब्ध होणारी आकडेवारीचा वापर करणे, या संदर्भात मा. सचिव (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०९.०४.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, दुष्काळाचे मुल्यांकन करण्यासाठी "महावेध" प्रणालीतील पर्जन्याची माहिती वापरण्यात यावी, तसेच खरीप २०१९ हंगामापासून मंडळनिहाय पर्जन्यमानाची नोंद ही महावेध प्रकल्पांतर्गत गठीत स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे उपलब्ध होणाऱ्या आकडेवारीवरून संकलित करण्यात यावी अशा सुचना क्र. २ वरील समक्रमांकाच्या दि. १२.०६.२०१९ च्या पत्रान्वये आयुक्त (कृषी) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार "महावेध" प्रणालीतीलच पर्जन्याची माहिती वापरण्यात यावी. महसुल विभागामार्फत मंडळ स्तरावर बसविण्यात आलेल्या म्यान्युअल पर्जन्यमापक यंत्रांच्या आधारे मिळणारी माहिती वापरण्यात येऊ नये. यापुढे "महावेध" प्रणालीतील आकडेवारीच महारेन पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल.

आपला,

(अ. ज. कांबळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रतः- १) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.